# द ॲडव्हेंचर्स ऑफ शेरलॉक होम्स

**लेखक**

**ऑर्थर कॉनन डायल**

**अनुवाद**

**विलास वि. फडके**

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**द अॅडव्हेंचर्स ऑफ शेरलॉक होम्स : विलास वि. फडके**

© सुरक्षित

**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. नं.: ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
सौ. वृषालीराज बडकस

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
रुपये २८०/-

# प्रास्ताविक

ह्या पुस्तकात ‘स्टडी इन स्कार्लेट’, ‘दि साईन ऑफ फोर’, ‘दि हाऊंड ऑफ दि बास्करव्हिल’ आणि दि व्हॅली ऑफ फिअर्स’ ह्या चार कादंबऱ्या वगळता शेरलॉक होम्सच्या काही कथांचा संग्रह आहे.

ह्या स्वरूपात तो सर्वप्रथम १८९२ साली ‘ए स्कॅन्डल इन बोहेमिया’ ह्या कथेतून अवतीर्ण झाला आणि १९२७ साली ‘सोकोंब ओल्ड प्लेस’ ह्या कथेद्वारे त्यानं आपला निरोप घेतला. त्याची पद्धती आणि व्यक्तिचित्र आत्तापर्यंत लोकांना चांगलंच परिचित झालं होतं त्यामुळे स्वाभाविकपणे वाचकांना आश्चर्य वाटणं कमी झालं व पूर्वीच्या कथांशी नवीन कथांची तुलना होऊ लागली. एकानं तर प्रतिक्रिया व्यक्त केली की, ‘‘भले तो कड्यावरून पडून मेला नसेल पण तो पूर्वीचा होम्स निश्चितच राहिला नाही.’’ मला विश्वास आहे की वाचकांनी ह्यापैकी कोणतीही कथा वाचली तरी त्यांना कथेची सुरुवात आणि शेवट जराही खटकणार नाही.आहेत.

**क्रोबरो, १९२८** **ऑर्थर कॉनन डायल**

# अनुक्रमणिका


- प्रेम होईना तुझ्याने! ... ७
  *ए स्कॅन्डल इन बोहेमिया*
- लाल केसांचा फास ... ३३
  *दि रेड हेडेड लीग*
- गेला साजण कुणीकडे ... ५८
  *ए केस ऑफ आयडेंटीटी*
- अपराधी कोण? ... ७७
  *दि बोस्कोम्ब व्हॅली मिस्टरी*
- दैवाचा न्याय! ... १०४
  *दि फाईव्ह ऑरेंज पिप्स*
- भिकेचे डोहाळे ... १२३
  *दि मॅन विथ ट्विस्टेड लिप*
- बदकानं गिळला नीलम ... १४८
  *दि ब्ल्यू कॉर्नुन्क्यल*
- दोराचा साप ... १६९
  *दि स्पेकल्ड बेल्ट*
- अंगठा गेला, जीव वाचला ... १९६
  *दि इंजिनिअर्स थंब*
- दिलदार नवरदेव ... २१७
  *दि नोबेल बॅचलर*
- घरची इज्जत ... २३९
  *दि बेरील कॉरोनेट*
- त्या ताम्र तरूखाली ... २६४
  *दि कॉपर बीचेस*

## प्रेम होईना तुझ्याने !

शेरलॉक होम्सच्या नजरेतून ती म्हणजे केवळ एक स्त्री होती. त्यानं तिचा दुसऱ्या एखाद्या नावानं उल्लेख केल्याचं मी क्वचितच ऐकलं आहे. त्याच्या दृष्टीनं ती सर्वसाधारण स्त्रियांपेक्षा काहीशी वरचढ होती एवढंच. यापलीकडे त्याला आयरिन ॲडलरबद्दल फारसं प्रेम वाटत असेल असं मला वाटत नाही. त्याच्या नेहमीच्या थंड आणि अलिप्त मनोवृत्तीच्या पुढे ती काहीशी अपवाद होती एवढंच! माझ्या मते तो म्हणजे निरीक्षण करून अचूक निष्कर्ष काढणारा जगातला एकमेव यंत्रमानवच असावा. एक प्रेमिक बनायचं ठरवलं असतं तर त्याला कधीच जमलं नसतं. काहीसं कुत्सित हसणं आणि तोंडातल्या तोंडात पुटपुटणं याव्यतिरिक्त त्याला आपल्या हळूवार भावना व्यक्तच करता येत नसत. एक उत्तम निरीक्षक आणि माणसाच्या बुरख्याआडचे उद्देश आणि कारवाया ओळखणं यात मात्र तो अव्वल नंबर होता. त्याच्यासारख्या तरबेज आणि निष्णात माणसाच्या मनातला हळुवार कोपरा उघड होणं आणि त्यानं कसोशीने सारवासारवीचा प्रयत्न करणं हे एकूणच त्याच्या मानसिक ताकदीविषयी संशय निर्माण करणारं होतं. एखाद्या नाजूक यंत्रात रेतीचा कण जाणं किंवा त्याच्या शक्तीशाली दुर्बिणीवर चट्टा पडणं यामुळं झाला नसता एवढा परिणाम या घटनेमुळे त्याच्यावर झाला आणि ही एकमेव स्त्री आयरिन ॲडलर त्याच्या स्मृतीत घर करून राहिली.

अलीकडे माझी आणि होम्सची भेट क्वचित झाली होती. माझं लग्न झाल्यामुळे आम्ही दोघे एकमेकांपासून दूर झालो होतो. एक गृहस्थ बनल्यामुळे आपल्या

घरादाराबद्दल वाटणारी आपुलकी, स्वतःचा उद्योग यात मी गुरफटून गेलो होतो. तर होम्स आमच्या बेकर स्ट्रीटवरच्या खोलीत जगापासून एकटा पडला होता. आपली जुनी-पुराणी पुस्तके आणि अधूनमधून कोकेनची इंजेक्शन्स् हा त्याचा वेळ घालवण्याचा मार्ग होता. मात्र, अजूनही त्याची बुद्धिमत्ता आणि पोलिसांनी हात टेकलेली प्रकरणं सोडविण्याचं कौशल्य कायम होतं. अधूनमधून त्याच्या कर्तबगारीच्या कहाण्या तुटक स्वरूपात ऐकायला मिळत. त्यात ओडेसा येथील ट्रिपाक खून प्रकरण, त्रिकोंमालीच्या ॲटकिन्सन बंधूंची शोकांतिका, हॉलंडमधील एका दुर्दैवी परिवाराला मिळवून दिलेला दिलासा इत्यादी प्रकरणांचा समावेश आहे. अशा तुरळक गोष्टी वगळता माझा मित्र व सहकारी असलेल्या होम्सविषयी फारसं काही ऐकायला मिळत नव्हतं.

२० मार्च १९८८, वेळ रात्रीची. मी आता रीतसर प्रॅक्टीस सुरू केली असल्यानं एका पेशंटला तपासून घरी परतत होतो. माझा मार्ग बेकर स्ट्रीटवरूनच जात होता. आमच्या दरवाजासमोरून जात असताना माझ्या मनात 'स्टडी इन स्कार्लेट' वेळच्या क्लेशदायक स्मृती जाग्या झाल्या. होम्सला भेटण्याची आणि तो कशात गुंतला आहे हे जाणून घेण्याची तीव्र ऊर्मी मनात दाटून आली. त्याच्या खोलीत भरपूर उजेड होता आणि मी बघत असतानाच त्याची आकृती दोन वेळा इकडून तिकडे गेल्याचं पडद्यावर पडलेल्या सावलीमुळं लक्षात आलं. आपली हनुवटी छातीला टेकवून तो घाईघाईने फेऱ्या मारत होता. हात पाठीमागे एकमेकांत गुंतले होते. यावरून तो पुन्हा एखाद्या कामगिरीत गुंतला होता हे निश्चित होतं. मला त्याच्या साऱ्या सवयी चांगल्या परिचयाच्या झाल्या असल्यानं त्याच्या हालचालीवरून सारं काही समजत होतं. कृत्रिम नशेतून तो बाहेर पडला होता आणि कशाच्या तरी मागावर होता. मी बेल वाजवली आणि एकेकाळच्या माझ्याच खोलीत प्रवेश केला.

मला बघून त्यानं काही फारसा उत्साह दाखविला नाही. ते त्याच्या स्वभावातच नव्हतं. पण त्याला आनंद झाला हे मात्र त्याच्या चेहऱ्यावरून लगेचच लक्षात आलं. एकही शब्द न बोलता केवळ प्रेमळ नजरेनं आणि हातानं इशारा करून त्यानं मला खुर्चीत बसण्याची खूण केली. आपली सिगार केस माझ्याकडे फेकली आणि व्हिस्कीची बाटली व गॅस लायटरकडे इशारा केला. नंतर आपल्या स्टाईलमध्ये शेगडीसमोर उभं राहून माझ्याकडे एक कटाक्ष टाकला.

‘‘तुला लग्न मानवलेलं दिसतं वॅटसन–’’ तो म्हणाला.

‘‘आपल्या मागील भेटीनंतर तुझं वजन साडेसात पौंडांनी वाढलेलं दिसतं!’’

‘‘सात पौंड! ’’ मी दुरुस्ती सुचवली.

‘‘अस्सं! म्हणजे मी अधिक बारकाईने विचार करायला हवा. तू पुन्हा प्रॅक्टिस सुरू केलेली दिसते. पण तू मला तसं बोलला नव्हतास.’’

‘‘मग तू कसं काय ओळखलंस?’’

‘‘मी बघितलं आणि तर्क केला. एवढ्या रात्रीचं तू ओल्या कपड्यात घरी चालला आहेस आणि दुसरं म्हणजे तुझ्याकडे काम करणारी मुलगी एक नंबरची वेंधळी आणि गलथान दिसते.’’

‘‘हे मात्र अतिच झालं हं होम्स–’’ मी म्हणालो. ‘‘तू काही शतकांपूर्वी जन्माला आला असतास तर जिवंत जाळला गेला असतास. मी गुरुवारी खेड्यात गेलो होतो आणि चिखलानं बरबटून परत आलो हे खरं आहे पण मी आल्यावर कपडे बदलले तरीसुद्धा हे तू कसं काय शोधून काढलंस मला काही समजत नाही. मेरी जेन गलथान आहे. सुधारण्यापलीकडची आहे हे खरं आहे. माझ्या बायकोनं तिला काढून टाकण्याची धमकीही दिली आहे पण हे सारं तू कसं काय ओळखलंस हे मात्र मला समजत नाही.’’

एवढ्यावर तो गालातल्या गालात हसला आणि आपले हात एकमेकावर चोळू लागला.

अगदी साधी गोष्ट आहे. तो सांगू लागला, ‘‘या शेगडीच्या उजेडात बघितलं तर तुझ्या डाव्या बुटाच्या चमड्यावर पाच सहा चरे गेलेले दिसतात. ते त्याच्यावर लागलेला चिखल कुणीतरी निष्काळजीपणानं खरवडून काढल्यामुळे पडले हे उघड आहे. आता माझ्या दुसऱ्या अनुमानाविषयी सांगतो, तू असल्या पावसाळी वातावरणात लंडनच्या बकाल वस्तीत गेलास. तुझ्या देहाला आयोडिनचा वास येतो आहे. उजव्या हाताच्या दुसऱ्या बोटावर सिल्व्हर नायट्रेटचा काळा डाग आहे. फुगलेल्या खिशावरून तेथे स्टेथास्कोप ठेवल्याचं  लक्षात येत आहे. या सर्व गोष्टींवरून तू आता प्रॅक्टिस सुरू केली आहेस हा तर्क काढता आला नाही तर माझ्यासारखा मूर्ख मीच.’’

त्यानं हे सारं समजावून सांगितल्यावर मी आलेलं हसू आवरू शकलो नाही. तू अशी कारणमीमांसा केलीस की.. मी बोलू लागलो. ‘‘सारं काही इतकं सोपं वाटू

लागतं की, हे सारं मीसुद्धा करू शकलो असतो. मात्र तू प्रत्येक मुद्दा समजावून सांगेपर्यंत मी गोंधळलेलाच होतो. तरीसुद्धा मला वाटतं की, माझे डोळे तुझ्या डोळ्यांइतकेच चांगले आहेत.''

''खरं आहे.'' तो सिगारेट पेटवून खुर्चीत बसत म्हणाला. ''पण तू केवळ बघतोस. निरीक्षण करीत नाहीस. दोन्हींमध्ये फार मोठा फरक आहे. उदाहरण द्यायचं झालं तर तू हॉलपासून या खोलीपर्यंत येणाऱ्या पायऱ्या अनेक वेळा बघितल्या आहेस.''

''अनेक वेळा.''

''किती वेळा?''

''शेकडो वेळा!''

''मग त्या किती आहेत?''

''किती आहेत ते नाही मला माहीत!''

''होय! तू निरीक्षण केलं नाहीस तरीही तू त्या बघितल्या आहेस. माझा मुद्दा हाच आहे. त्या सतरा आहेत हे मला माहीत आहे. कारण मी त्या बघितल्या आहेत आणि त्याचं निरीक्षणही केलं आहे. ते जाऊदे! तुला छोट्यामोठ्या प्रकरणांत रस असतो आणि तू माझी काही कामं शब्दबद्धही केली आहेस तेव्हा कदाचित तुला या प्रकरणात रस वाटेल.'' असं म्हणून त्यानं टेबलावर पडलेला लालसर गुलाबी कागद माझ्यासमोर टाकला. ''हा शेवटच्या डाकेने आला.'' तो म्हणाला, ''जरा मोठ्यांदा वाच बघू.''

त्या पत्रावर तारीख नव्हती तसंच सही आणि पत्ताही नव्हता.

'आज रात्री पावणे आठ वाजता आपल्याला भेटण्यासाठी एक सद्‌गृहस्थ येणार आहेत. अत्यंत नाजूक प्रश्नाच्या बाबतीत त्यांना आपला सल्ला हवा आहे. अलीकडेच आपण युरोपमधील एका शाही घराण्याला जी सेवा दिलीत त्याबद्दल ही अत्यंत महत्त्वाची कामगिरी विश्वासानं आपल्याकडे सोपवायला हरकत नाही असं आम्हाला वाटतं. सर्व बाजूंनी मिळालेल्या माहितीवरून आमची तशी खात्री झाली आहे. कृपया ठरलेल्या वेळी आपल्या ऑफिसमध्ये उपस्थित राहा आणि आपल्या भेटीसाठी येणाऱ्या व्यक्तीनं बुरखा घातलेला असेल त्याचा बाऊ करू नका!'

''हा साराच रहस्यमय प्रकार दिसतो. तू यावरून काय निष्कर्ष काढतोस?''

''अजून तरी मी काही निष्कर्ष काढलेला नाही. पुरेशी माहिती हाती आल्याशिवाय कोणतेही अनुमान बांधणं ही घोडचूक आहे. त्यामुळे तुमचे निष्कर्ष वस्तुस्थितीला धरून असू शकत नाही. आता हे पत्रच बघ. तू यावरून काय निष्कर्ष काढू शकतोस?''

मी तो कागद आणि त्यावर लिहिलेला मजकूर पुन्हा एकदा नीट बघितला.

''हे पत्र लिहिणारा माणूस चांगल्या उच्च घराण्यातला दिसतो.'' मी माझ्या मित्राच्या पद्धतीची नक्कल करीत म्हणालो. ''या प्रकारचा कागद अर्ध्या क्राऊनला पाकीट इतक्या स्वस्त दरात मिळणं तर मुळीच शक्य नाही. तो चांगला जाड आणि कडक आहे.''

''तू चांगला म्हणालास हीच विशेष गोष्ट आहे.'' होम्स म्हणाला. ''तो इंग्लंडमध्ये तयार झालेला कागद नाही. तो जरा उजेडात धर बघू.''

मी त्याप्रमाणे केलं. त्यावर मोठ्या अक्षरातील 'ई' व छोटी 'जी' त्याचप्रमाणे मोठी 'पी' 'जी' व छोटी 'टी' दिसली.

''तू यावरून काय तर्क काढतोस?'' होम्सने विचारले.

''कारखान्याचं नाव किंवा पत्र पाठविण्याचं बोधचिन्ह?''

''मुळीच नाही. मोठी जी आणि छोटी टी म्हणजे गिझेल शॉफ्ट. या जर्मन शब्दाचा अर्थ आहे कंपनी. आपण जसं कंपनीचं लघुरूप Co असं करतो तशी ती त्याची पद्धत आहे. पी चा अर्थ आहे पॅपिअर. आता Eg म्हणजे काय ते बघूया! आपल्या कॉन्टिनेंटल गॅझेटियरवर नजर टाकू.'' असं म्हणत त्यानं मांडणीवरून एक जाडजूड ग्रंथराज उचलला. ''इग्लो, इग्लोनिटस हां सापडला! एग्रिया म्हणजे जर्मन भाषेत बोहेमिया! आता याचा अर्थ काय?'' एक धुराचा लोट सोडत त्यानं प्रश्न केला. त्याचे डोळे उत्साहानं चमकत होते.

''हा कागद बोहेमियात तयार झालेला आहे.''

''अगदी बरोबर आणि हे पत्र लिहिणारा इसम जर्मन आहे. तू त्या वाक्याची विशिष्ट रचना बघितलीस ना? एखादा फ्रेंच किंवा एशियन इसम अशा पद्धतीनं लिहिणार नाही. क्रियापदांच्या बाबतीत जर्मन लोकच ही पद्धत वापरतात. आता बोहेमियन कागदावर लिहिण्याऱ्या या इसमाला आणि बुरखा घालून येणाऱ्याला काय हवंय हाच प्रश्न आहे. माझा अंदाज चुकत नसेल तर तोच आला आहे. आता आपल्या साऱ्या शंका मिटतील.''

तो हे बोलत असतानाच खालून घोड्याच्या टापांचा आणि गाडीच्या चाकांचा आवाज ऐकू आला. त्यापाठोपाठ घंटीही वाजली. होम्सनं हळूच शीळ घातली.

''आवाजावरून दोन घोडे असावेत असं वाटतं.'' तो खिडकीतून खाली नजर टाकत म्हणाला. गाडी मोठी छान दिसते आणि घोडेही. नक्की दीडशे गिनीजना पडली असणार. या प्रकरणात बाकी काही नाही तरी पैसा बऱ्यापैकी मिळेल वॅटसन.''

''मला वाटतं होम्स की, मी आता निघावं!''

''नाही! नाही. तू आहेस तिथेच बसून राहा. हे प्रकरण चांगलं रंगतदार असणार ते चुकविण्यात अर्थ नाही. ''

''पण तुझ्या ग्राहकाचं काय?''

''त्याचं मनावर घेऊ नकोस. कदाचित मला तुझी मदत लागेल तशीच त्यालाही लागेल. तो आलाच. त्या खुर्चीत बस आणि नीट लक्ष दे!''

आधी पायऱ्यांवर नंतर व्हरांड्यात सावकाश पण दमदार पावलांचा आवाज ऐकू आला. तो दरवाजाबाहेर थांबला. पाठोपाठ दरवाजावर जोरदार थाप पडली. तिच्यातूनही अधिकार प्रतीत होत होता.

''आत या!'' होम्स म्हणाला.

आत आलेला माणूस चांगला साडेसहा फूट उंच होता. छाती व खांदे चांगले हर्क्युलससारखे रुंद होते. त्याच्या अंगावरचा पोषाख चांगला भारी होता पण इंग्लिश माणसाच्या नजरेतून खालच्या अभिरुचीचा होता. अंगात डबल ब्रेस्टेड कोट, त्यावर लालभडक झूल, बायांवर तऱ्हेतऱ्हेच्या फिती, उंच बूट सारा अवतार एकूणच प्रेक्षणीय होता. एका हातात हॅट होती आणि दुसऱ्या हातानं तो आपल्या चेहऱ्याचा वरचा अर्धा भाग झाकणारा बुरखा सतत सारखा करीत होता. त्याच्या जाड आणि पुढे आलेल्या ओठांवरून त्याचं व्यक्तिमत्त्व अधिकार गाजवणारं वाटत होतं.

''तुम्हाला माझं पत्र मिळालं?'' त्यानं काहीशा कर्कश सुरात विचारलं. त्याचे उच्चार जर्मन धाटणीचे वाटत होते. मी येणार असल्याचं कळविलं होतं.'' आम्हा दोघांकडे आळीपाळीने बघत आपण कुणाशी बोलतोय हे न कळल्यानं तो काहीसा गोंधळला होता.